# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०१० मधील निशाणी क्र. १३९ वरील आदेश</u>

## <u>(गुराप्पा व इतर वि. बाबु व इतर)</u>

प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रकरणातील निशाणी क्र. ११६ वरील आदेशाप्रमाणे कमिशन कामकाज तालुका निरीक्षक भूमिअभिलेख यांचे कडे पाठविण्यात यावे याकरिता दाखल केला आहे. वादींतर्फे त्याचे म्हणणे निशाणी क्र. १४१ कडे देण्यात आले आहे.

२) प्रस्तुत अर्जात प्रतिवादींतर्फे असे कथन करण्यात आले आहे की, प्रतिवादींनी निशाणी क्र. ११६ कडे कोर्ट कमिशन करिता अर्ज देऊन विनंती प्रार्थना केल्या होत्या. सदर अर्जाची गुणदोषावर चौकशी होऊन अर्ज मंजूर झाला. सदर आदेशावर नाराज होऊन वादीने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्र. ३९८२/२०१८ दाखल केले. सदर रिट पिटीशनची गुणदोषावर चौकशी होऊन वादीचे रिटी पिटीशन फेटाळण्यात आले. सदर रिट पिटीशनचे आदेशाची प्रमाणित नक्कल व कमीशन करिता लागणारे चालू ७/१२ उतारे या अर्जासोबत फेरीस्तने दाखल केलेले आहेत. यापूर्वी प्रतिवादींनी निशाणी क्र. ११६ चे आदेशाप्रमाणे कमिशन करिता लागणारे सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. सबब, निशाणी क्र. ११६ वरील आदेशाप्रमाणे कमिशन कामकाज तालुका निरीक्षक भूमिअभिलेख यांचे कडे पाठविण्यात येऊन कमिशनचे कामकाज वेळेचे बंधन घालून मुदतीत अहवाल सादर करणेबाबत योग्य ते न्यायाचे आदेश व्हावेत अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आलेली आहे.

३) वादींतर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे दाखल केले आहे की, सदर प्रकरणी वादींनी यापूर्वीच निशाणी क्र. १३८ कडे सविस्तर अर्ज देऊन या प्रकरणी खालील कोर्टांनी प्रस्तुतचा अंशतः चौकशीवर असलेला दावा ६ महिन्याच्या आत पूर्णत्वास न्यावा व त्याचा न्यायनिर्णय करावा, असा निःसंदिग्ध आदेश मे. न्यायालयास केलेला आहे. प्रतिवादींनी निशाणी क्र. ११६ कडे जो कोर्ट कमिशनच्या नियुक्ती बाबत अर्ज खालील कोर्टात दाखल केला होता त्या कामी मे. न्यायालयाने दि. १३/०३/२०१८ रोजी कोर्ट कमिशनच्या नियुक्तीचा आदेश पारित केला. त्यावर नाराज होऊन वादींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन तेथे याचिका क्र. ३९८२/२०१८ या नंबरची दाखल करून खालील कोर्टाच्या झाल्या कोर्ट कमिशन नियुक्तीच्या अर्जास विविध मुद्दे उपस्थित करून कनिष्ठ कोर्टाच्या आदेशास आव्हान दिले. कालौघात सदरची याचिका गुणदोषावर मे. उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर सुनावणीस आली. त्यावेळी मे. उच्च न्यायालयांनी वादींनी दाखल केलेली याचिका नामंजूर करताना प्रस्तुतचा दावा यापुढे कसा चालवावा याची मार्गदर्शक सूची उच्च न्यायालयांनी त्यांच्या आदेशामध्ये ठळकपणे स्पष्ट केली आहे. त्याची सूची पुढील प्रमाणे नमूद केलेली आहे. ती अशी की, वादी यांची दाखल केलेली याचिका नामंजूर करण्यात आलेली आहे, मे. कोर्टांनी सदरचा जो दावा अंशतः चौकशीवर नेमण्यात आलेला आहे त्याची संपूर्ण चौकशी पूर्णत्वास नेऊन त्याचा न्यायनिर्णय ६ महिन्यात करावा, दाव्याची संपूर्ण सुनावणी झाल्यानंतर यदाकदाचित मे. कोर्टास काही बाबींचे स्पष्टीकरण अथवा खुलासा होणे न्यायनिर्णय करताना आवश्यक आहे असे वाटल्यास मे. कोर्ट मर्जीनुरूप कोर्ट कमिशनची नियुक्ती करू शकेल, त्याच प्रमाणे दावा अंशतः चौकशीवर असताना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशन नियुक्तीचा अर्ज मंजूर करता

येणार नाही व याबाबत मे. उच्च न्यायालयाने Shaikh Isak (vide para 19 of the order – in writ petition) या न्यायमूर्तीच्या न्यायनिवाड्याचा दाखला दिलेला आहे.

४) वादींचे पुढील प्रतिकथन असे की, सदर चारही मार्गदर्शक सुचींचा सांगोपांग विचार करता आता कोर्ट कमिशनर नियुक्तीचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे प्रतिवादींना आता नव्याने निशाणी क्र. १३९ चा कोर्ट कमिशन नियुक्तीचा पुनश्च अर्ज दाखल करता येणार नाही व तो मे. न्यायालयास मंजुरही करता येणार नाही अशी एकूण परिस्थिती दिसते. सबब, प्रस्तुतचा कोर्ट कमिशन नियुक्तीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आलेली आहे.

५) अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

६) प्रस्तुत अर्जातील विनंतीचा प्रकरण संचिकेतील दावा, कैफियत, या टप्प्यापर्यंत नोंदविण्यात आलेला पुरावा व मा. उच्च न्यायालयाने दिवाणी याचिका क्र. ३९८२/२०१८ चे कामी दि. १९/०७/२०२२ रोजी पारित केलेला आदेश यांचे अनुषंगाने विचार केला असता सर्वप्रथम ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, मा. उच्च न्यायालयाने वर नमूद दिवाणी याचिकेचे कामी पारित केलेल्या आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी प्रतिवादींनी दिलेल्या अर्ज निशाणी क्र. ११६ वरील आदेशाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्तांकडे पाठविणे जरुरीचे आहे काय हे प्रतिवादींनी दर्शवून दिले आहे काय हे पाहणे

आवश्यक आहे. सदर विनंतीच्या पार्श्वभूमीवर प्रतिवादींचे विधिज्ञांनी सादर केलेल्या युक्तिवादानुसार व अर्जात केलेल्या कथनानुसार मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद दिवाणी याचिकेच्या कामी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणातील वादींनी अर्ज निशाणी क्र. ११६ वरील आदेशावर नाराज होऊन केलेली सदरची दिवाणी याचिका फेटाळली असल्याचे व त्यामध्ये या न्यायालयाने निशाणी क्र. ११६ कडे पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची जरूर नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले असल्याचे दिसून येते. या न्यायालयाचे तत्कालीन विद्वान पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रतिवादींचा निशाणी क्र. ११६ कडील अर्ज गुणदोषावर मंजूर करून प्रकरण उपअधीक्षक, भूमिअभिलेख, जत यांचेकडे बिळूर, ता. जत, जि. सांगली येथील गट क्र. ९०४, ९४४ व ९४५ च्या मिळकतींची मोजणी करून त्याबाबतचा नकाशासह असणारा सविस्तर अहवाल आयुक्ताचे काम प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत सादर करण्याचा आदेश पारित केला आहे. वादींनी सदर आदेशास दिवाणी याचिकेद्वारे मा. उच्च न्यायालयात दिलेले आव्हान संपुष्टात आले असल्यामुळे व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास वादींनी मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असल्याचे दर्शवून दिले नसल्यामुळे यापूर्वी निशाणी क्र. ११६ वर पारित करण्यात आलेल्या आदेशाप्रमाणे प्रकरण मोजणीकरिता पाठविण्यासाठी कोणताही प्रत्यवाय दिसून येत नाही. त्याकरिता आवश्यक असणारी गट क्र. ९४४, ९०४ व ९४५ चे अद्ययावत सातबारा उतारे व मा. उच्च न्यायालयाने दिवाणी याचिका क्र. ३९८२/२०१८ चे कामी पारित केलेल्या आदेशाची सत्यप्रत अशी कागदपत्रे प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत यादी निशाणी क्र. १४० सोबत हजर केली आहेत.

(७) वादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणेद्वारे हरकत घेऊन जी कथने नमूद केली आहेत त्या कथनांचे आधारेच त्यांनी निशाणी क्र. १३८ कडे प्रतिवादींना तोंडी पुरावा सादर करण्याचे निर्देश देण्याची विनंती केलेला अर्ज गुणदोषावर सविस्तर कारणमीमांसा नमूद करून नामंजूर केला असल्यामुळे मी प्रतिवादींच्या सदर हरकतींच्या अनुषंगाने पुन्हा या आदेशाचे कामी सविस्तर ऊहापोह केवळ द्विरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने नमूद केलेला नाही. अर्ज निशाणी क्र. १३८ च्या निर्णयाचे कामी नमूद केलेल्या कारणमीमांसे आधारे मी असे नमूद करतो की, प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास घेतलेल्या हरकतींमध्ये कोणतेही तथ्य नाही. त्यामुळे त्या फेटाळण्यात येत आहेत. या सर्व कारणमीमांसेचा विचार केला असता वादींचा प्रस्तुतचा अर्ज त्यांनी विनंती केल्याप्रमाणे मंजूर करणे जरुरीचे आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. ११६ कडील आदेशाप्रमाणे करावी लागणारी पूर्तता केली असल्यामुळे निशाणी क्र. ११६ वरील आदेशास अनुसरून प्रस्तुतचे प्रकरण उपअधीक्षक, भूमिअभिलेख, जत यांचेकडे मोजणी करण्याकरिता पाठविण्यात यावे.

३. उपअधीक्षक, भूमिअभिलेख, जत यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुतचे प्रकरण मा. उच्च न्यायालयाने सहा महिन्याच्या कालावधीत निर्णित करण्याचे निर्देश दिले

असल्यामुळे सदर मोजणीचे काम प्राधान्याने आयुक्त काम प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत विनाविलंब पूर्ण करून त्याचा सविस्तर अहवाल निशाणी क्र. ११६ कडील आदेशामधील निर्देशाप्रमाणे बिनचूक सादर करावा.

EKNATH KOYAPPA CHOUGALE
Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2023.01.04 12:19:07 +0530

स्थळ:– जत (एकनाथ को. चौगले)

दि. २१/१२/२०२२. (JO Code -MHSN2400)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

जत

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २१/१२/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २३/१२/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०४/०१/२०२३. |